ePaper

# लोकसभा निवडणुकीमध्ये जनतेची चोख कामगिरी; शरद पवार



॥ वर्ष - 7 । अंक - 348 ॥ UDYAM-MH-26-0158827 ॥

महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

**आतील पानांत**

- धोनीचा चाहत्याबरोबरचा व्हिडीओ व्हायरल
- संतापलेल्या हारिसने पत्नीलाही ढकललं
- वाराणसीत मोदींची मोठी घोषणा!
- फडणवीस उपमुख्यमंत्रीपदी कायम

www.mahaenews.com | बुधवार, दिनांक 19 जून 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी

# सहकार बँकांना बुस्टर!

## साखर संकुल येथे बैठकीत सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील यांचे प्रतिपादन

। पुणे । महाईन्यूज

**राज्यातील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करून त्यांना अडचणीतून बाहेर काढण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे, असे प्रतिपादन सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील यांनी केले. साखर संकुल, पुणे येथे राज्यातील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांच्या आर्थिक स्थितीचा व पीक कर्ज वाटपाचा आढावा घेण्यासाठी आयोजित केलेल्या बैठकीत ते बोलत होते.**





यावेळी आमदार प्रविण दरेकर, सहकार, पणन आणि वस्त्रोद्योग विभागाचे अपर मुख्य सचिव अनुप कुमार, सहकार आयुक्त दीपक तावरे, अपर आयुक्त व विशेष निबंधक शैलेश कोतमिरे, महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे प्रशासक विद्याधर अनास्कर, माजी आमदार शिवाजी कर्डीले, आमदार मानसिंगराव नाईक, विविध जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांचे पदाधिकारी, संचालक, मुख्य कार्यकारी अधिकारी, विभागीय सह निबंधक उपस्थित होते. श्री. वळसे पाटील म्हणाले, अडचणीतील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना आर्थिक अडचणीतून बाहेर काढून त्याचा अधिकाधिक शेतकऱ्यांना लाभ होण्याच्या दृष्टीने प्रस्ताव तयार करावा. आर्थिक अडचणीतील नागपूर आणि नाशिक या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांचा कृती आराखडा सादर करणे बाबत रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाकडून सूचना प्राप्त झाल्या आहेत. या बँकांची स्थिती सुधारण्यासाठी वेगळी योजना राबविण्याबाबत विचार करण्यात यावा. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक आणि विकास सोसायटीच्या आर्थिक सक्षमतेच्यादृष्टीने विभागाने नियोजन करावे. विभागाच्या अधिकाऱ्यांनी नवीन विविध कार्यकारी सहकारी सोसायटीची स्थापना करण्यासाठी प्रयत्न करावेत. आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांनी नाविन्यपूर्ण उपक्रम राबवावेत. अनास्कर म्हणाले, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांनी आपले व्यवहार पारदर्शक राहील, याबाबत दक्षता घ्यावी. राज्य सहकारी बँकेच्या वतीने जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना विश्वासात घेऊन सहकार्य करण्यात येईल, याबाबत एक योजना आखण्यात येईल.

### वेळेत पीक कर्ज वाटप करण्याची कार्यवाही व्हावी

बँकांनी पात्र शेतकऱ्यांना पुरेशा प्रमाणात व वेळेत पीक कर्ज वाटप करण्याची कार्यवाही करावी. वेळेत कर्जाची परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना कर्ज मिळाल्याबाबत संबंधित जिल्हा निबंधक सहकारी संस्था किंवा सहायक निबंधक यांनी खात्री करावी. छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेअंतर्गत असलेली प्रलंबित प्रकरणे तातडीने निकाली काढण्याबाबत कार्यवाही करावी, असेही मंत्री वळसे पाटील म्हणाले. आमदार दरेकर यांनी अडचणीत असलेल्या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना बाहेर काढण्यासाठी शासनाच्या वतीने भरीव तरतूद करण्यात यावी आणि याबाबत एक स्वतंत्र यंत्रणा निर्माण करण्याबाबत सूचना केली.

## मंत्रिपदासाठी पिंपरी-चिंचवड शहरातून मोर्चे बांधणी

### आ. बनसोडे यांच्या माध्यमातून अजितदादा 70 वर्षाचा अनुशेष भरुन काढतील; अजित गव्हाणे

। पिंपरी । महाईन्यूज ।





आमदार अण्णा बनसोडे यांना मंत्रिमंडळाच्या विस्तारामध्ये स्थान मिळावे यासाठी पिंपरी चिंचवड शहर राष्ट्रवादी अजितदादा गट पक्षाच्या शहराध्यक्ष अजित गव्हाणे व विविध सेलच्या वतीने पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्याकडे जोरदार मागणी केली आहे. राज्यस्तरावर मंत्रिमंडळ विस्ताराची चर्चा सुरू असताना आमदार अण्णा बनसोडे यांचे नाव मंत्रिमंडळ विस्तारामध्ये आघाडीवर असून त्यांच्या नावावर शिक्कामोर्तब होईल अशी शहर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला खात्री आहे. पिंपरी चिंचवड शहराच्या ७० वर्षाचा अनुशेष बनसोडे यांच्या मंत्रीपदामुळे भरून निघेल असा विश्वास पक्षाचे अध्यक्ष अजित गव्हाणे यांनी व्यक्त केला. अजितदादा पवार यांचे कट्टर समर्थक म्हणून राज्यभर ओळख असलेले आमदार बनसोडे यांचा शहरातील दांडगा जनसंपर्क तसेच नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणूकीत पिंपरी विधानसभा मतदारसंघातून खासदार श्रीरंग बारणे यांना मिळालेले मताधिक्य याच्या बळावर आमदार बनसोडे यांचा मंत्रीपद देऊन शहरातील सामान्य कार्यकर्तांला व समाजाला न्याय देण्याचे काम होईल अशी खात्री राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या विविध सेलच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली.

### उपमुख्यमंत्र्यांना निवेदने

शहरातील विविध सेलच्या पदाधिकाऱ्यांनी आमदार बनसोडे यांना मंत्रिपद मिळावे यास आशयाची निवेदने उपमुख्यमंत्र्यांकडे पाठवले आहेतयामध्ये शहराचे अध्यक्ष अजित गव्हाणे महिला अध्यक्ष कविता आल्हाट, युवक अध्यक्ष शेखर काटे, युवती अध्यक्ष वर्षा जगताप, सामाजिक न्याय विभागाचे शहराध्यक्ष संजय औसारमल , ओबीसी सेलचे अध्यक्ष विजय लोखंडे, कार्याध्यक्ष फजल शेख, अल्पसंख्याक विभागाचे अध्यक्ष युसुफ कुरेशी, सेवा दल शहराध्यक्ष महेश झपके, झोपडपट्टी सेलचे अध्यक्ष संतोष निसर्गंध आधी पदाधिकाऱ्यांचा समावेश आहे. एकंदरीत शहरातून आमदार बनसोडे यांना मंत्री पद मिळावे यासाठी जोरदार मोर्चे बांधणी होत असताना दिसून येते.

# वर्षाविहारासाठी लोणावळ्यात गर्दी!

## वाहतूक व्यवस्थेत तात्पुरते बदल, बंदोबस्तासाठी अतिरिक्त कुमक

।पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**वर्षाविहारासाठी लोणावळा शहर परिसरात मुंबई-पुण्यातील पर्यटकांची होणारी गर्दी विचारात घेऊन पोलिसांनी वाहतूक व्यवस्थेत तात्पुरते बदल केले आहेत. लोणावळा परिसरात कोंडी सोडविण्यासाठी अतिरिक्त पोलीस बंदोबस्त नेमण्यात येणार आहे.**



पावसाळा सुरू झाल्यानंतर दरवर्षी मुंबई-पुण्यासह राज्यातील वेगवेगळ्या भागातील पर्यटक लोणावळा, खंडाळा परिसरात गर्दी करतात. सलग सुट्या आल्यास पर्यटकांच्या गर्दीत वाढ होते. शनिवार आणि रविवार या दोन दिवशी पर्यटकांची उच्चांकी गर्दी होती. लोणावळ्यातील भूशी धरणाकडे जाणाऱ्या रस्त्यावर कोंडी होते. पर्यटकांची वाहने कोंडीत अडकतात. कोंडीमुळे उडणारा गोंधळ, तसेच लोणावळ्यातील वाहतूक विस्कळीत होत असल्याने पोलिसांनी आतापासून नियोजन सुरू केले आहे, अशी माहिती लोणावळ्याचे उपविभागीय पोलीस अधिकारी सत्यसाई कार्तिक यांनी मंगळवारी पत्रकार परिषदेत दिली. लोणावळा शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुहास जगताप यावेळी उपस्थित होते. शनिवार, रविवारला जोडून सुटी आल्यास पर्यटकांची गर्दी होती. लोणावळा, खंडाळा, पवनानगर परिसरात पर्यटक मोठ्या संख्येने दाखल होतात. वाहतुकीचे नियोजन करण्यासाठी पुणे ग्रामीण पोलीस मुख्यालयातून अतिरिक्त १०० पोलीस कर्मचाऱ्यांची कुमक मागविण्यात आली आहे. कोंडी सोडविण्यासाठी गृह रक्षक दलाचे जवान तैनात केले जाणार आहेत. पोलीस मित्रांचे पथक पोलिसांना सहाय करणार आहे. याबाबत वाहतूक पोलिसांनी पोलीस मित्र, स्वयंसेवकांना सूचना दिल्या आहेत, असे उपविभागीय अधिकारी कार्तिक यांनी नमूद केले. मुंबई- पुणे राष्ट्रीय महामार्गावर होणारी वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी अंबरवाडी गणपती मंदिर परिसरातील अंतर्गत रस्त्यावरून पुण्याकडे जाणारी वाहने इंदिरानगर, तुंगार्ली, नारायणधाम पोलीस चौकी समोरून मुंबई पुणे राष्ट्रीय महामार्गावर वळविण्यात येणार आहे. भुशी धरणाकडून पुण्याकडे जाणाऱ्या वाहनचालकांनी कैलासनगर स्मशानभूमी, हनुमान टेकडी, कुसगाव गणपती मंदिर मार्गे सिंहगड महाविद्यालय परिसरातून द्रुतगती मार्गावर जावे. मुंबईकडे जाणारी वाहनचालकांनी रायवुड पोलीस चौकी, खंडाळा गेट क्रमांक ३०, अपोलो गॅरेज येथील रेल्वे फाटक परिसरातून जावे.

### नियोजनासाठी नियंत्रण कक्ष

वाहतुकीचे नियोजन करण्यासाठी कुमार पोलीस चौकीत नियंत्रण कक्ष सुरू करण्यात येणार आहे. नियंत्रण कक्षातून लोणावळा शहरातील कोंडीवर लक्ष ठेवण्यात येणार असून, कुमार पोलीस चौकी, ए वन चिक्की चौक, मिनू गॅरेज चौक, मावळी पुतळा चौक, सहारा पूल परिसरात ध्वनीवर्धक लावण्यात येणार आहे. ध्वनिवर्धकावरुन वाहनचालकांना माहिती देण्यात येणार आहे. लोणावळा बाजार परिसरात होणारी कोंडी सोडवण्यासाठी भांगरवाडी इंद्रायणी पूल ते छत्रपती शिवाजी महाराज चौक दरम्यान एकेरी मार्ग सुरू करण्यात आला आहे. लोणावळ्यात येणारी वाहने पुरंदरे शाळेसमोरील रस्ता, तसेच भांगरवाडीकडे जाणारी वाहने छत्रपती शिवाजी महाराज चौकातून मुख्य रस्त्याने जाणार आहेत. शहरात सम-विषम दिनांकानुसार वाहने लावण्याची व्यवस्था उपलब्ध करून देण्यात आली आहे. बेशिस्तपणे वाहने लावणाऱ्या वाहनचालकांविरुद्ध कारवाई करण्यात येणार आहे, अशी माहिती उपविभागीय पोलीस अधिकारी सत्यसाई कार्तिक यांनी दिली.

# कचरा मुक्त कसबा मतदारसंघाची संकल्पना!

## पावसाळी समस्यांवर उपाययोजना आवश्यक: हेमंत रासने यांचे पुणे नगरपालिका प्रशासनाला निवेदन

।पुणे ।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**कसबा मतदारसंघाच्या कसबा, विश्रामबाग व भवानी पेठ क्षेत्रीय कार्यालया अंतर्गत येणाऱ्या परिसरात मोठ्या प्रमाणावर कचऱ्याची समस्या भेडसावत आहे. सदरील भाग हा दाट लोकवस्ती, मुख्य बाजार पेठ तसेच निवासी भाग, असा संमिश्र असल्यामुळे मोठ्या प्रमाणावर कचरा होत असतो. महानगर पालिकेने कंटेनर मुक्त कचरा व्यवस्थापन केलेले असले तरी सदरील जागांवर अजून कचरा टाकला जात आहे. व सदरील कचरा वेळेवर उचलला जात नसल्याने नागरिकांना विविध आरोग्यविषयक समस्या उद्भविण्याची शक्यता आहे. त्यावर तातडीने उपाययोजना कराव्या, अशी मागणी कसबा विधानसभा भाजपा निवडणूक प्रमुख हेमंत रासने यांनी पुणे महानगरपालिका जनरल सहा. आयुक्त श्री. रविंद्र बिनवडे यांच्याकडे केली.**




कसबा, विश्रामबाग आणि भवानी पेठ क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत येणाऱ्या ६ प्रभागांच्या विविध प्रश्नांसंदर्भात रासने यांच्या नेतृत्वात भाजपच्या शिष्टमंडळाने पुणे महापालिका जनरल सहायक आयुक्त श्री. रवींद्र बिनवडे आणि अतिरिक्त आयुक्त श्री. पृथ्वीराज बी. पी. यांची आज भेट घेतली. यावेळी "कचरा मुक्त कसबा मतदार संघ" संकल्पना राबवण्यासाठी महानगर पालिकेने सहकार्य करण्याची विनंती रासने यांनी केली. तसेच कसबा मतदारसंघातील मोठ्या प्रमाणावर होणारी वाहतूक कोंडीचीही समस्या सोडविण्याची मागणी श्री. हेमंत रासने यांनी महापालिका प्रशासनाकडे केली.

दरम्यान, पावसाळी समस्यांवर त्वरित उपाययोजना करण्यासाठी तसेच प्रभागातील काही प्रलंबित समस्या लवकर सोडवण्यासाठीचे निवेदन देखील देण्यात आले. पावसाळी गटार लाईन स्वच्छ नसल्यामुळे विविध ठिकाणी पावसाचे पाणी तुंबून नागरिकांच्या घरांमध्ये व दुकानांमध्ये शिरत आहे. परिणामी नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. तसेच ड्रेनेज लाईन साफ न केल्यामुळे विविध ठिकाणी ड्रेनेज तुंबणे आणि त्याचे पाणी उलटे नागरिकांच्या घरात जाणे तसेच धोकादायक झाडे, फांद्या पडणे अशा समस्यांचा सामना नागरिकांना करावा लागत असल्याने नागरिकांना दिलासा देण्यासाठी पालिकेने योग्य ती कारवाई करण्याची मागणी रासने यांनी केली आहे.

### यांची उपस्थिती...

यावेळी कसबा मंडल अध्यक्ष राजेंद्र काकडे, माजी नगरसेवक दिलीप काळोखे, तेजेंद्र कोंढरे, योगेश समेळ, राजेश येनपुरे, मनिषा लडकत, गायत्रीताई खडके, उदय लेले, राजू परदेशी, छगन बुलाखे, विष्णूआप्पा हरिहर, विजयालक्ष्मी हरिहर, अर्चना पाटील, सुनील खंडागळे तसेच कसबा मतदारसंघाचे सरचिटणीस अमित कंक, प्रणव गंजीवाले, चंद्रकांत पोटे, उमेश चव्हाण, कसबा मतदारसंघ महिला मोर्चा अध्यक्षा अश्विनीताई पवार, तसेच कसबा मतदारसंघातील इतर पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

# ‘वाहतूक कोंडीमुक्त’ भोसरी मतदार संघासाठी

# सर्वसमावेशक ‘ॲक्शन प्लॅन’!

## भाजपा आमदार महेश लांडगे यांचा पुढाकार; वाहतूकसंबंधी सर्व विभागांची महत्त्वपूर्ण बैठक

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**“वाहतूक कोंडी मुक्त” भोसरी विधानसभा मतदार संघासाठी महापालिका, पोलीस प्रशासन आणि संबंधित सर्व विभागांनी सर्वसमावेशन ‘ॲक्शन प्लॅन’ तयार करण्यात येणार आहे. तसेच, खासगी बस यांचे थांबे निश्चित केले जाणार आहेत. वाहतूक सक्षम करण्यासाठी ठोस उपाययोजना करण्यासाठी स्वतंत्र समिती गठीत करण्यात आली आहे. यासाठी भाजपा आमदार महेश लांडगे यांनी पुढाकार घेतला आहे.**



भोसरी विधानसभा मतदार संघातील वाहतूक समस्यांबाबत आमदार महेश लांडगे यांच्या पुढाकाराने महत्त्वपूर्ण बैठक घेण्यात आली. यावेळी महापालिका प्रभारी आयुक्त तथा ‘पीएमआरडीए’चे आयुक्त राहुल महिवाल, अतिरिक्त आयुक्त विजय खोराटे, महापालिका मुख्य अभियंता मकरंद निकम, वाहतूक विभागाचे पोलीस उपायुक्त विशाल गायकवाड, सहाय्यक पोलीस आयुक्त भास्कर डेरे, सर्व पोलीस निरीक्षक, पीएमपीएमएल अधिकारी, महावितरण अधिकारी, आरटीओ अधिकारी, स्थापत्य, उद्यान विभाग आणि क्षेत्रीय अधिकारी आदी उपस्थित होते. या बैठकीमध्ये अपघाताचे हॉट स्पॉट आणि त्यावरील उपाययोजना याबाबत चर्चा करण्यात आली.

यावेळी नाशिक फाटा ते मोशीपर्यंत मोठ्या प्रमाणात झाडे आहेत. काही झाडे जीर्ण झाल्यामुळे येत्या पावसाळ्यात काही ठिकाणी पडण्याची शक्यता आहे, तर ती धोकादायक झाडांचे पुन:रोपण करावे. आवश्यक त्या ठिकाणी छटाई करण्याची सूचना वाहतूक पोलिसांनी केली. आवश्यकतेनुसार पी-वन आणि पी-टू याचे पार्किंग नियोजन करावे. अनेक ठिकाणी सिग्नलजवळ किंवा सिग्नल उभारण्यासाठी रस्त्याची खोदाई होते आणि डागडुजी न केल्यामुळे तिथे खड्डा निर्माण होतो. त्यामुळे वाहतुकीस अडथळा करणारे खड्डे तात्काळ बुजवावेत, अशी सूचना अधिकाऱ्यांना करण्यात आली.

### वर्दळीच्या ठिकाणी अवजड वाहनांना बंदी...

वाहतूक वर्दळीच्या ठिकाणी, शाळा, प्रशासकीय कार्यालयाच्या ठिकाणी अवजड वाहनांना नियमाप्रमाणे सकाळी 10 ते रात्री 10 पर्यंत बंदी असावी. तसेच, अवैधरित्या अवजड वाहने लोकवस्तीच्या ठिकाणी उभा केलेली असतात. त्यावर कडक कारवाई करण्याच्या सूचना दिल्या आहेत. वाहतूक सक्षम करण्यासाठी सर्व प्रशासकीय विभागांनी समन्वय करून वाहतूक पोलिसांना सहकार्य करावे. महानगरपालिकेने १५० वार्डन वाढवून देण्याची विनंती पोलीस प्रशासनाने केली आहे. त्यावर कार्यवाही करावी. भोसरी चौक, चऱ्होली चौक, चिखली चौक, तळवडे चौक, डुडूळगाव चौक, ममता चौक, दिघी येथील खड्डे त्वरित बुजूवण्यात आले आहेत.

### धोकादायक डीपी हटवण्याची कारवाई...

देहू फाटा ते जगताप कार्यालयपर्यंत दोन इलेक्ट्रिक पोल आहेत ते काढून घेण्यात यावेत. ममता पार्क, दिघी येथील धोकादायक डीपी हटवावेत. आवश्यकतेनुसार पर्यायी रस्ते म्हणून दुसऱ्या रस्त्याकडे वाहतूक वळवणे. रिवर चौक चिखली येथील डिव्हायडर पूर्ण करणे. डायमंड चौक, कुदळवाडी येथील मोईला जाणारा रस्ता छोटा असल्यामुळे ट्राफिक समस्या नेहमीची असते तेथे कर्मचारी वाढवणे आणि रस्ता मोठा करणे. देहू-आळंदी रोडवर पाणीपुरवठा विभागाचे पाईप पडलेले आहेत. ते तात्काळ उचलून घेण्यात यावेत, अशा सविस्तर सूचनाही आमदार लांडगे यांनी केल्या आहेत.

> वाहतूक कोंडी मुक्त शहर करण्यासाठी आम्ही सातत्याने प्रयत्न करीत आहोत. समाविष्ट गावांसह दाट लोकवस्ती असलेल्या परिसरात वाहतुकीचे सुक्ष्म नियोजन करण्याबाबत प्रशासनाला सूचना केल्या आहेत. महापालिका, वाहतूक पोलीस, आरटीओ, पीएमपीएमएल, एमएसईबी अशा सर्वच विभागांनी मान्सूनच्या धर्तीवर सतर्क राहणे आवश्यक आहे. त्यासाठी एकत्रितपणे वाहतूक सक्षमीकरणासाठी ‘ॲक्शन प्लॅन’ तयार करणार आहोत. वाहतूक कोंडी मुक्त मतदारसंघ करण्यासाठी नागरिकांनी वाहतूक नियमांचे पालन करावे व आपल्या सूचना निश्चित कळवाव्यात. पुणे-नाशिक नाशिक रोड व कॅनबे चौक- चिखली, पुणे नाशिक रोडवर ट्रॅफिक वॉर्डनसह अतिरिक्त ट्रॅफिक पोलिस वाढवण्यात येणार आहेत.
>
> **-महेश लांडगे,** आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

> शहरातील वाहतूक सुरळीत होण्यासाठी महापालिकेच्या यंत्रणांसह पोलीस प्रशासन, वाहतूक शाखा यांनी समन्वय साधून कारवाई करावी. बसथांबे आणि रिक्षाथांबे निश्चित करून त्यांचे अनुपालन करण्यासाठी संबंधितांना सूचना कराव्या. शहरातील धोकादायक झालेली झाडे, पालखी मार्गातील अतिक्रमणे त्वरित काढण्यात यावेत. शहरातील पथारीवाले महापालिकेने त्यांच्यासाठी निश्चित केलेल्या ठिकाणी गाड्या लावतील याची दक्षता घ्यावी. पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर पुढील ९० दिवस अतिशय महत्वाचे असून प्रशासनाने त्याबाबत दक्ष राहावे.
>
> **-राहुल महिवाल,** आयुक्त पीएमआरडीए, पिंपरी-चिंचवड महापालिका.

# चऱ्होलीतील तनिष्क पार्क, प्राईड वर्ल्ड सिटीपर्यंत पीएमपी बस सुविधा!

## आमदार महेश लांडगे यांचा ‘ऑन दी स्पॉट’ निर्णय, पीएमपीएमएल अधिकाऱ्यांची बैठक

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**भोसरी विधानसभा मतदार संघातील चऱ्होली गाव मोठ्या प्रमाणात विकसित होत आहे. येथील तनिष्क पार्क सोसायटी आणि प्राईड वर्ल्ड सिटीपर्यंत मोठ्या प्रमाणात नागरीकरण झाले असून, भविष्यात पिंपरी-चिंचवडचा हा ‘एन्ट्री पॉईंट’ राहणार आहे. त्यामुळे या भागात पीएमपी बस सुविधा लवकरच सुरू करण्यात येणार आहे. या कामी भाजपा आमदार महेश लांडगे यांनी पाठपुरावा सुरू केला आहे.**




चऱ्होली आणि परिसरातील सार्वजनिक प्रवासी वाहतूक सुविधा सक्षम करण्याबाबत बैठक घेण्यात आली. यावेळी पीएमपीएमएल ट्रॉन्सपोर्ट मॅनेजर सतीश गव्हाणे, सर्व डेपो मॅनेजर उपस्थित होते. तसेच, बैठकीनंतर तात्काळ फिल्ड व्हीजिट करण्यात आली. यावेळी सामाजिक कार्यकर्ते सचिन तापकीर, पीएमपीएलचे विजयकुमार मदगे, भास्कर दहातोंडे, आमदार लांडगे यांचे स्वीय सहायक अनिकेत गायकवाड, संदेश बडिगर उपस्थित होते.

तनिष्क पार्क सोसायटी आणि प्राईड वर्ल्ड सिटी सोसायटी चऱ्होली या ठिकाणाहून महिला, विद्यार्थी व कामगार वर्ग मोठ्या प्रमाणात पुणे, पिंपरी-चिंचवड परिसरात प्रवास करीत आहेत. मात्र, या सध्या या ठिकाणी बस सुविधा उपलब्ध नसल्यामुळे प्रवाशांची गैरसोय होत आहे.

तसेच, भविष्यात हा परिसर शहरात प्रवेश करण्यासाठी प्रवेशद्वार म्हणून उदयास येणार आहे. त्यामुळे सार्वजनिक प्रवासी वाहतूक सुविधा या ठिकाणी निर्माण होण्याची आवश्यकता आहे. ‘पीएमपीएमएल’ चे परिवहन व्यवस्थापक सतीश गव्हाणे म्हणाले की, आमदार महेश लांडगे यांच्या सूचनेनुसार, दिघी- आळंदी, चाकण फाटा-मोशी टोलनाका, देहू-आळंदी, चिखली रोड या मार्गावरील बस सुविधा वाढवण्याबाबत रुट सर्व्हेक्षण करण्यात येणार आहे. तसेच, चऱ्होली परिसरात पंतप्रधान आवास योजना प्रकल्प मार्गे प्राईड सोसायटी आणि तनिष्क पार्क अशा दोन मार्गांवर पाहणी करुन या मार्गावर बस सुविधा कार्यान्वयीत करण्यात येणार आहे. चऱ्होली परिसरात शहरीकरण वाढत आहे. त्यामुळे बस सुविधा वाढवण्याबाबत आमदार लांडगे यांनी सूचना केली आहे.

> चऱ्होली परिसरातील तनिष्क पार्क सोसायटी आणि पंतप्रधान आवास योजना प्रकल्प मार्गे प्राईड वर्ल्ड सिटी येथे नवीन पीएमपीएमएल बस सुविधा निर्माण करण्याबाबत प्रशासनाला सूचना केली आहे. नागरिकांच्या मागणीनुसार, या भागात पीएमपीएमएल बस सुविधा सुरू होईल. त्यासाठी आम्ही पाठपुरावा करणार आहोत. तसेच, समाविष्ट गावांतील वाढत्या लोकसंख्येचा विचार करता पीएमपी बसची वारंवारिता वाढवण्याबाबत धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी पुढाकार घेणार आहोत.
>
> **-महेश लांडगे,** आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड.



## भूमिका

**एकटे रहा, हेच शांतीपूर्ण आहे. असा अर्थ या सुभाषितामध्ये दडलेला आहे. असं म्हणतात एकटं राहिल्यावर स्वतःला शोधता येतं . एकटे रहा अर्थात कायमचे एकटेपणा स्वीकारून आपले जीवन व्यतीत करणे नाही तर काही वेळेपुरते आपल्याला शोधण्यासाठी एकांतात राहणे होय. त्यामुळे घडलेल्या कार्याचा , घटनांचा वेध घेता येतो. चिंतन करता येतं . कधी कधी मन एखाद्या घटनेने निराश , हताश झालेले असते.**

# अनाकलनीय मनाचा गोंधळ

रोज बोलणारी आवडती व्यक्ती देखील अशा निराशेच्या वेळी दूर राहावी आणि आपण मौन धारण करून केवळ स्वतःशी संवाद साधावा असे वाटत असते. ज्या क्षणी असे वाटते त्या क्षणापासून मौन धारण करून जी रोजची कामं नाहीत तशी कामं आपण करावी. काम करता करता त्यात आपण इतके गुंतून जातो की ते कामात आपण रममाण होतो. आपल्या आत डोकावत जातो. आपण वरवर शांत असलो तरी आपल्या आत मात्र गोंधळ असतो . आपल्या गोंधळ भरल्या मनाच्या गाभाऱ्यात जाऊन प्रश्नांचे स्तोत्र आपण गायला हवे. उत्तरांची इंद्रिये आपल्याला जागोजागी भेटतील . आपल्याशी बोलतील. आपल्या विचारांचे एक एक पदर उलगडत जातील . आपण स्वतःला हलके हलके जाणवू लागू.एखाद्याच्या मनात आपल्याबद्दल आकस असेल, राग असेल, त्याला आपल्याला शिव्या घालण्याची इच्छाही होत असेल परंतु ती व्यक्ती तरीही आपल्याशी



गोड बोलून आपल्याला तिळमात्रही या त्याच्या वर्तणुकीची शंका येणार नाही अशा प्रकारे वागत असेल तर त्याचा हा चांगुलपणा म्हणावा का? की आपला चांगुलपणा म्हणावा? की गैरसमज वृंदावत असल्याचे समजावे.? ज्या क्षणी आपल्याला या गोष्टीबद्दल ज्ञात होते त्या क्षणी आपण हताश झालेले असतो. स्तब्ध होतो. अनाकलनीय अस्वस्थता आपल्या आत खोलवर शिरते . अशा वेळी आपण चिडचिड करतो. त्या व्यक्तीबद्दल संताप व्यक्त करतो. नको ते बोलून जातो. किंबहुना त्यांना काहीतरी बोलून त्यांचे मन दुखावतो. परंतु अशा वेळी आपण शांत राहणे जास्त समर्पक आहे. घडलेल्या प्रकारचा विचार करणे आणि त्या संदर्भात गतकाळात जाऊन त्याची मीमांसा करणे महत्वाचे आहे. आपण कोणती गोष्ट चांगली केली आणि कोणती वाईट याकडे आपण त्रयस्थ होऊन बघावं. वाईट केली असेल तर का वाईट केली आणि आपल्या मते वाईट नसेल तर त्यांना ते पटवून देण्याची गरज असते. ते आपण करावं. स्वतःला समाधानी करण्यासाठी आपली कृती नसावी तर सर्वांच्या हिताची आणि सत्याच्या बाजूची आपली कृती असावी. व्यक्ती तितक्या प्रवृत्ती. तरीही शांततेची वृत्ती जीवनाकडे बघण्याचा दृष्टीकोन व्यापक करण्यास मदत करते. स्वतः मध्ये परिवर्तन घडवून आणण्यास प्रवृत्त करते. जाणिवांना संवेदन प्राप्त करून देते. सर्वात महत्वाचे आणि गरजेचे म्हणजे इतरांना आपल्या मताची जाणीव करून देते. कधी कधी माणसं आपल्याला नको ते बोलून, वाईट वागून आपल्याशी एकदमात संबंध तोडून जातात. याक्षणी आपण मौन घेतलेलं बरं. याचा अर्थ त्याला आपल्या योग्यतेची जाणिव करून देऊ नये असे नाही. कारण त्यांना जाणीव करून दिली नाही तर ती जाणीव नंतरही त्यांना होत नाहीच. त्यामुळे जाणीव करून द्यायलाच हवी. मात्र त्यासाठी योग्य वेळ निश्चित करावी लागते. योग्य बोलण्याची मनाची तयारी करावी लागते. स्वतःला प्रश्न उत्तरांच्या परिसंवादात ठेवून चाचपावे लागते. स्वतःसाठीच चर्चासत्र उपयोजावे लागते. इतरांशी झालेल्या संवादा पेक्षा स्वतःशी केलेला संवादाचे फलित लवकर आणि योग्य त्या प्रमाणात मिळते. अकारण नको तेंव्हा नको ती बडबड रबरासारखी असते. या मानसिकतेने आपणच आपल्याला मनस्ताप देऊन आपल्या प्रकृतीला आव्हान देणे कधीही घातकच ठरेल. आपल्या आत डोकावत जातो. आपण वरवर शांत असलो तरी आपल्या आत मात्र गोंधळ असतो . आपल्या गोंधळ भरल्या मनाच्या गाभाऱ्यात जाऊन प्रश्नांचे स्तोत्र आपण गायला हवे. उत्तरांची इंद्रिये आपल्याला जागोजागी भेटतील . आपल्याशी बोलतील. आपल्या विचारांचे एक एक पदर उलगडत जातील . आपण स्वतःला हलके हलके जाणवू लागू.एखाद्याच्या मनात आपल्याबद्दल आकस असेल, राग असेल, त्याला आपल्याला शिव्या घालण्याची इच्छाही होत असेल परंतु ती व्यक्ती तरीही आपल्याशी गोड बोलून आपल्याला तिळमात्रही या त्याच्या वर्तणुकीची शंका येणार नाही अशा प्रकारे वागत असेल तर त्याचा हा चांगुलपणा म्हणावा का? की आपला चांगुलपणा म्हणावा?

## प्रासंगिक »

# जी-७ चे फलित


***जी-७ देशांच्या शिखर परिषदेत भारताचा जागतिक प्रभाव जाणवला. ही परिषद भारत-पश्चिम-युरोप इकॉनॉमिक कॉरिडॉर (आयएमईसी) सारख्या ठोस पायाभूत सुविधांच्या प्रस्तावांना प्रोत्साहन देण्यासाठी वचनबद्ध आहे.***

तिसऱ्यांदा भारताच्या पंतप्रधानपदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर लगेच जी-७ देशांच्या शिखर परिषदेसाठी नरेंद्र मोदी यांना उपस्थिती लावावी लागली. दक्षिण आशियातून फक्त भारताला या परिषदेचे निमंत्रण होते, यावरून भारताचे जागतिक महत्त्व लक्षात यायला हरकत नाही. त्यातही अन्य सहा देशांचे नेते त्यांच्या त्यांच्या देशात अडचणीत आले असताना मोदी यांनी मात्र तिसऱ्यांदा सत्ता मिळविल्याने यजमान इटली आणि भारत या दोन देशांचे नेतेच खऱ्या अर्थाने शक्तीशाली होते. त्यातही मोदी यांच्या तिथे जाण्यापूर्वीच यजमान देशाच्या पंतप्रधान भारतीय पद्धतीने नमस्कार करून पाहुण्यांचे स्वागत करीत होत्याण् तिसऱ्यांदा पंतप्रधान झाल्यानंतर मोदी यांचा हा पहिलाच विदेश दौरा होता.

जनजागृती करण्याचे आयोजन करण्यात आले आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी बी वैष्णवी यांचे मार्गदर्शनाखाली जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बळीराम गाढवे यांनी नियोजन केले आहे जिल्ह्यात गावोगावी आरोग्य कर्मचारी, आशा स्वयसेविका यांचे मार्फत सिकलसेलवर जनजागृती करण्यात येणार आहे.

# जागतिक सिकल सेल दिनानिमित्त जनजागृती

हा आजार आनुवंशिक आहे याचा परिणाम लाल रक्तपेशीचे संरचणेवर होतो लाल रक्तपेशी आकाराने गोल आणि लवचिक असतात त्यामुळे रक्त वाहिन्या मधून सहजतेने पुढे जातात परंतू सिकलसेल आजारात लाल रक्तपेशीचा आकार बदलतो अर्धचंद्राकृती, ताठर व चिकट बनतात त्यामुळे रक्त वाहिण्यामध्ये अडथळा निर्माण होउन रक्त प्रवाह मंदावतो लक्षणे = याची लक्षणे वयाच्या सहाव्या महिन्यापासून असतात अशक्तपणा = शरीरातील लाल रक्तपेशी कमी झाल्याने आक्शीजणची कमतरता होउन अशक्तपणा येतो तिव्र वेदना = सिकलसेल आकाराचे लाल रक्तपेशी असल्याने शरीरात छाती ,उदय, सांधे यांना रक्त पुरवठा होत असताना रक्त वाहिण्यामध्ये अडथळा निर्माण होतो त्यावेळी रुग्णांना वेदना होतात या वेदना कांही त्यापासून ते कांही वर्षे पर्यंत राहु शकतात कांही रुग्णांना असा वेदनांचा त्रास वर्षातुन दोन वेळा होतो .हा त्रास किशोर व प्रोढ वयोगटात



जास्त आढळतो हात पायावर सूज =सिकलसेल लाल रक्तपेशी रक्त प्रवाह मध्ये अडथळा निर्माण झाल्याने हात पायावर सूज येतेवाढ व तारुण्य उशीरा होणे = लाल रक्तपेशी शरीराला पोशक तत्व व ऑक्शिजण पुरवठा कमी प्रमाणात करत असल्याने वाढ उशीरा होतेदृष्टि समस्या = सिकलसेल रक्त पेशी डोळ्याना रक्त पुरवठा करणाऱ्या रक्त वाहिन्याना रोखतात त्यामुळे दृष्टी समस्या होउ शकते यासाठी हे करावे = भरपूर पाणी पिणे, निरोगी रहाणे, हिमोग्लोबीन वाढीसाठी फळे खाणे, नियमित व्यायाम करणे, फॅलीक ॲसिड घेणेहे करु नये = डॉक्टरांचे सल्याशिवाय औषध घेउ नये, जास्त उष्ण किंवा थंड वातावरणात बाहेर पडू नये, लक्षणे तिव्र होण्याची वाट पाहु नये, वेळेत वैद्यकीय सल्ला घ्याराष्ट्रीय सिकलसेल निर्मूलन कार्यक्रमा अंतर्गत अकोला जिल्ह्यात गावनिहाय, शाळा निहाय आणि इतर स्तरावर लाभार्थ्यांची सिकल सेल आजाराची तपासणी करण्यात येत आहे. यामध्ये सिकल सेल ग्रस्त रुग्णांचे सिकल सेल क्रायसिस, तीव्र रक्तक्षय व आवश्यक आरोग्य तपासणी साठी नियमित पाठपुरावा करण्यात येत आहे. सिकल सेल ग्रस्त रुग्णांना क्रायसिस होऊ नये आणि वारंवार रक्त लावण्याची गरज पडू नये म्हणून हैड्रोक्सियूरिया हे औषध सर्व रुग्णांना सुरु करण्याचे ठरविले आहे. सध्या जिल्ह्यात रुग्णांना हैड्रोक्सियूरिया हे औषध सुरु केले असून त्यांच्या आरोग्य उत्कृष्ट असा बदल झाला आहे . व्यतिरिक्त जिल्ह्यात सर्व गरोदर स्त्रियांची प्रसूतीदरम्यान सिकल सेल तपासणी आणि ज्या स्त्रिया वाहक किवा रुग्ण आढळल्यास त्यांच्या पतींची सुद्धा तपासणी करण्यात येत आहे.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**


**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# वसईत भर दिवसा रस्त्यावर प्रेयसीची हत्या!

## लोखंडी पान्याने वार करून प्रेयसीची हत्या करण्यात आली हत्या

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**वसईत भर दिवसा रहदारीच्या रस्त्यावर एका 20 वर्षीय मुलीची हत्या करण्यात आली. या जगात माणुसकी शिल्लक आहे का? असा प्रश्न निर्माण व्हावा अशी घटना मुंबईलगतच्या एका शहरात घडली आहे.**




या महाराष्ट्राला पुरोगामी महाराष्ट्र अशी ख्याती आहे. पण याच महाराष्ट्राची राजधानी असलेल्या मुंबई शहराच्या जवळच्या वसई शहरात अशाप्रकारची घटना घडणे यापेक्षा लाजिरवाणी कोणतीच गोष्ट असू शकत नाही. या मुलीचा तसा काहीच दोष नव्हता. तिचा फक्त दोष इतकाच होता की, तिचं आरोपीवर प्रेम होतं. आरोपीने तिच्या प्रेमाची जाणीव ठेवली नाही. याउलट त्याने भर रस्त्यात तिची निर्घृणपणे हत्या केली. प्रेम ही भावना फार वेगळी असते. प्रेमात फार समर्पण, संवेदनशीलपणा, जाणीव असावी लागते. पण आरोपीला याबाबतचं ज्ञान कधी मिळालं नसावं. आरोपीने तिची हत्या केली. विशेष म्हणजे मुलीचा जीव वाचू शकला असता. कारण घटना घडली तेव्हा अनेक जण तिथे उपस्थित होते. अनेक लोक रस्त्याने ये-जा करत होते. एका नागरिकाने आरोपीला अडविण्याचा प्रयत्न केल्याचे व्हिडीओमध्ये दिसत आहे परंतु आरोपीच्या हातात हत्यार असलल्याने त्याची एकट्याची शक्ती कमी पडली परंतु इतरांनी त्याला मदत करण्याचे सोडून बघ्याची भूमिका घेण्यात आणि व्हिडीओ काढण्यात धन्यता मानली. पण कुणीही त्या मुलीला वाचवण्यासाठी पुढे गेलं नाही. त्यामुळे या मुलीला जीव गमवावा लागला. अतिशय लाजिरवाणी घटना आहे. वसईमध्ये प्रेयसीची भर रसत्यात निर्घृण हत्या करण्यात आल्याचा एक व्हिडीओ व्हायरल होत आहे. प्रियकराकडून लोखंडी पान्याने वार करुन प्रेयसीची हत्या करण्यात आली. वसईच्या वाळवी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे. या प्रकरणी पोलिसांचा पुढील तपास सुरु आहे. विशेष म्हणजे हत्येची घटना घडली तेव्हा बघ्यांची मोठी गर्दी घटनास्थळी होती. पण तरुणीला वाचवण्यासाठी कुणीही पुढे सरसावलं नाही. बघ्यांनी व्हिडीओ रेकॉर्ड केला. पण आरोपीला कुणीही रोखलं नाही. विशेष म्हणजे आरोपीने हत्या करतानाचा लाईव्ह व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. वसई पूर्व चिंचपाडा परिसरात आज सकाळी साडेआठ वाजेच्या सुमारास ही घटना घडली आहे. आरती यादव (वय 20) असं हत्या झालेल्या तरुणीचे नाव आहे. तर रोहित यादव असे हत्या करणाऱ्या आरोपीचं नाव आहे. आरोपीने प्रेयसीच्या डोक्यात लोखंडी पाना मारून तिची हत्या केली. विशेष म्हणजे हत्या करताना बघ्यांची मोठी गर्दी केलेली होती. पण कोणीही तिला सोडवले नाही. काहींनी घटनेचा व्हिडीओ बनवला. सध्या आरोपीला वाळीव पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. आरोपीने प्रेयसीची हत्या का केली? या मागचं कारण आता समोर आलं आहे. पोलिसांनी स्वत: याबाबतची माहिती दिली आहे. मृत तरुणी आणि तिची हत्या करणारा तिचा प्रियकर यांच्यात सातत्याने भांडण सुरु होतं. तरुणीचं दुसऱ्या कुणासोबत प्रेम प्रकरण सुरु आहे, असा संशय आरोपी प्रियकराला होता. त्यातून दोघांमध्ये भांडणं सुरु होती. याच भांडणातून आरोपीने तरुणीची हत्या केली. आरोपीने राग मनात धरुन एक मोठ्या इंडस्ट्रीयल पान्याने मुलीच्या डोक्यात मारुन तिची हत्या केली. या हल्ल्यात मुलीचा जागीच मृत्य झाला. याप्रकरणी हत्येचा कलम 302 अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. मी लोकांना आवाहन करतो की, अशा घटना घडल्या तर लगेच पुढे जायला हवं. मुलीचा जीव वाचवण्यासाठी सर्वांनी प्रयत्न केलं पाहिजे. दुर्देवाने तसा प्रकार झाला नाही. सुषमा अंधारे यांनी या घटनेवर हळहळ व्यक्त केली आहे. दिवसाढवळ्या एखाद्या तरुणीची अशा पद्धतीने हत्या होते आणि लोक बघत राहतात. दहा-पंधरा लोक आजूबाजूने जात आहेत. पण नुसतेच बघत आहेत. हे सगळं चित्र विदारक आहे. मुलीच्या मदतीसाठी एकही माणूस जात नाही. एक माणूस जाताना दिसतोय. पण त्याची शक्ती कमी पडताना दिसतेय इतका तो इसम रागात असावा.

### राज्य महिला आयोगाकडून दखल

रस्त्यावर एका 20 वर्षीय मुलीची हत्या करण्यात आली. या जगात माणुसकी शिल्लक आहे का? असा प्रश्न निर्माण व्हावा अशी घटना मुंबईलगतच्या एका शहरात घडली आहे. या प्रकरणाची राज्य महिला आयोगाकडून दखल घेतली गेली आहे. रूपाली चाकणकर यांनी आरोपीवर आवश्यक ती कलमे जोडून ठोस दोषारोपपत्र पोलिसांनी करावे असे निर्देश दिले आहेत. वसई येथील घडलेली घटना अतिशय हिंसक आहे. भर रस्त्यात अशी घटना घडते ही चिंताजनक आहे. अनेकांनी बघ्याची भूमिका घेतली. याप्रकरणी आरोपीला कठोर कारवाई व्हावी यासाठी राज्य महिला आयोग पाठपुरावा करेल. या महाराष्ट्राला पुरोगामी महाराष्ट्र अशी ख्याती आहे. पण याच महाराष्ट्राची राजधानी असलेल्या मुंबई शहराच्या जवळच्या वसई शहरात अशाप्रकारची घटना घडणे यापेक्षा लाजिरवाणी कोणतीच गोष्ट असू शकत नाही.मुलांचे असे हिंसक वागणे, हत्या करण्यापर्यंत मजल जाणे आणि सोबतच अशी घटना घडत असताना लोकांनी बघ्याची भूमिका घेणे चिंताजनक असल्याचं चाकणकर यांनी म्हटलं आहे. पोलीस निरीक्षक नन्नवरे यांना फोन करून आरोपीवर कडक कारवाई करण्याच्या सूचना दिल्या आहेत. तर आरोपीवर कडक कारवाई होईपर्यंत राज्य महिला आयोग लक्ष घालेल.

# फडणवीस महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्रीपदी कायम

## दिल्लीत महाराष्ट्र भाजपाच्या कोअर कमिटी बैठकीत निर्णय

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**नुकताच झालेल्या लोकसभा निवडणुकीत राज्यात महायुतीला पराभवाचा सामना करावा लागला होता. या पराभवाचं विश्लेषण करण्यासाठी काल (मंगळवारी) दिल्लीत महाराष्ट्र भाजपाच्या कोअर कमिटीची बैठक आयोजित करण्यात आली होती.**

फडणवीस यांच्या राजीनाम्याच्या मुद्द्यावरही चर्चा होईल, असंही सांगितलं जात होतं. दरम्यान, या बैठकीत भाजपाच्या केंद्रीय नेतृत्वाने देवेंद्र फडणवीस यांचा राजीनाम्याचा प्रस्ताव अमान्य केल्याचं पुढे आलं आहे. दिल्लीत झालेल्या या बैठकीनंतर केंद्रीय मंत्री पियूष गोयल यांनी यासंदर्भात माहिती दिली आहे. लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रात भाजपाचा पराभव झाला असला, तरी राज्यातील नेतृत्वात कोणताही बदल होणार नाही, असं पियूष गोयल यांनी सांगितलं. तसेच आगामी विधानसभा आम्ही



आणखी जोमाने लढू असेही ते म्हणाले.दरम्यान, यावेळी देवेंद्र फडणवीस यांनीही या बैठकीत झालेल्या चर्चेबाबत माहिती दिली. महाराष्ट्र कोअर टीमची केंद्रीय नेतृत्वासोबत बैठक पार पडली असून यावेळी राज्यातील निकालांवर चर्चा झाली, असे ते म्हणाले. तसेच महायुती आणि मविआमधील मतांमध्ये केवळ ०.३ टक्क्यांचाच फरक असून आम्हाला कुठे मते कमी पडली, या विषयावर चर्चा झाली, असेही त्यांनी सांगितलं.यावेळी देवेंद्र फडणवीस यांच्या राजीनाम्याच्या मुद्द्यावरही चर्चा होईल, असंही सांगितलं जात होतं. दरम्यान, या बैठकीत भाजपाच्या केंद्रीय नेतृत्वाने देवेंद्र फडणवीस यांचा राजीनाम्याचा प्रस्ताव अमान्य केल्याचं पुढे आलं आहे. दिल्लीत झालेल्या या बैठकीनंतर केंद्रीय मंत्री पियूष गोयल यांनी यासंदर्भात माहिती दिली आहे. लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रात भाजपाचा पराभव झाला असला.

### आम्हाला कुठे मते कमी पडली

पियूष गोयल यांनी सांगितलं. तसेच आगामी विधानसभा आम्ही आणखी जोमाने लढू असेही ते म्हणाले.दरम्यान, यावेळी देवेंद्र फडणवीस यांनीही या बैठकीत झालेल्या चर्चेबाबत माहिती दिली. महाराष्ट्र कोअर टीमची केंद्रीय नेतृत्वासोबत बैठक पार पडली असून यावेळी राज्यातील निकालांवर चर्चा झाली, असे ते म्हणाले. तसेच महायुती आणि मविआमधील मतांमध्ये केवळ ०.३ टक्क्यांचाच फरक असून आम्हाला कुठे मते कमी पडली.

# वाराणसीत मोदींची मोठी घोषणा!

## किसान योजनेचे 20 हजार कोटी रुपये शेतकऱ्यांच्या खात्यात!

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**लोकसभा निवडणुकांचे निकाल जाहीर झाल्यानंतर पहिल्यांदाच पंतप्रधान नरेंद्र मोदींनी त्यांच्या मतदारसंघात, अर्थात वाराणसीमध्ये दौरा केला. यावेळी केलेल्या भाषणादरम्यान मोदींनी मोठी घोषणा केली आहे. पीएम किसान योजनेच्या १७व्या हप्त्यासाठीचे तब्बल २० हजार कोटी रुपये लाभार्थी शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्याची प्रक्रिया सुरू करण्याची घोषणा त्यांनी केली. त्यामुळे देशभरात या योजनेशी निगडीत तब्बल ९ कोटी २६ लाख शेतकऱ्यांच्या खात्यांमध्ये प्रत्येकी २ हजार रुपये जमा झाले आहेत.**



पंतप्रधान नरेंद्र मोदींचा लोकसभा मतदारसंघ असणाऱ्या वाराणसीमध्ये आज पीएम किसान योजनेसंदर्भात मोठी घोषणा करण्यात आली. खुद्द पंतप्रधानांनी ही घोषणा केली असून त्यानुसार पीएम किसान योजनेद्वारे शेतकऱ्यांना मिळणाऱ्या निधीचा १७वा हप्ता जारी करण्यात आला आहे. या योजनेनुसार प्रत्येक लाभार्थी शेतकऱ्याच्या खात्यात थेट प्रत्येकी दोन हजार रुपये जमा झाले. आज तब्बल ९ कोटी २६ लाख शेतकऱ्यांच्या खात्यांमध्ये ही रक्कम जमा झाली. त्यामुळे ती तब्बल २० हजार कोटींच्या घरात जात असल्याचं स्पष्ट झालं आहे. २०१९ साली या योजनेची घोषणा करण्यात आली होती. त्यानुसार केंद्र सरकार देशातील शेतकऱ्यांच्या खात्यांमध्ये दर वर्षाला ६ हजार रुपये जमा करेल. हे पैसे दर चार महिन्यांनी दोन हजार रुपयांचा एक हप्ता अशा पद्धतीने वर्षभरात तीन हप्त्यांमध्ये जमा केले जाणार आहेत.दरम्यान, पीएम किसान योजनेचा निधी जारी केल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदींनी महिला बचत गटातील तब्बल ३० हजार महिलांना प्रमाणपत्रांचं वाटप केलं.निवडणुका जिंकल्यानंतर आज मी पहिल्यांदा वाराणसीत आलो आहे. भारतात झालेल्या निवडणुकांमध्ये देशाच्या ६४ कोटींहून जास्त लोकांनी मतदान केलं आहे. पूर्ण जगात याहून मोठ्या निवडणुका कुठे होत नाहीत जिथे इतक्या मोठ्या संख्येनं लोक मतदानात सहभाग घेता. मी जी ७ च्या परिषदेसाठी इटलीला गेलो होतो. जी ७ च्या सर्व देशांच्या सर्व मतदारांना एकत्र केलं तरी भारतातल्या मतदारांची संख्या त्यांच्यापेक्षा दीडपट जास्त आहे. युरोपियन युनियनच्या सर्व मतदारांना एकत्र केलं तरी भारतीय मतदारांची संख्या त्यांच्यापेक्षा अडीचपट जास्त आहे. या निवडणुकीत ३१ कोटींहून जास्त महिलांनी सहभाग घेतला आहे. एका देशात महिला मतदारांनी सहभाग घेतल्याबाबत जगात सर्वाधिक आहे. अमेरिकेच्या जवळपास पूर्ण लोकसंख्येइतकं हे प्रमाण आहे”, असं मोदी यावेळी म्हणाले. सरकार स्थापन होताच शेतकरी व गरिबांशी निगडीत निर्णय घेण्यात आला. गरीबांसाठी ३ कोटी नवी घरं, पीएम किसान निधी जारी करणं हे निर्णय कोट्यवधी भारतीयांची मदत करतील”, असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यावेळी म्हणाले.पंतप्रधान नरेंद्र मोदींचा लोकसभा मतदारसंघ असणाऱ्या वाराणसीमध्ये आज पीएम किसान योजनेसंदर्भात मोठी घोषणा करण्यात आली. खुद्द पंतप्रधानांनी ही घोषणा केली खात्यात थेट प्रत्येकी दोन हजार रुपये जमा झाले. आज तब्बल ९ कोटी २६ लाख शेतकऱ्यांच्या खात्यांमध्ये ही रक्कम जमा झाली.२० हजार कोटींच्या घरात जात असल्याचं स्पष्ट झालं आहे.

### 31 कोटी महिलांनी सहभाग घेतला

२०१९ साली या योजनेची घोषणा करण्यात आली होती. त्यानुसार केंद्र सरकार देशातील शेतकऱ्यांच्या खात्यांमध्ये दर वर्षाला ६ हजार रुपये जमा करेल. हे पैसे दर चार महिन्यांनी दोन हजार रुपयांचा एक हप्ता अशा पद्धतीने वर्षभरात तीन हप्त्यांमध्ये जमा केले जाणार आहेत.दरम्यान, पीएम किसान योजनेचा निधी जारी केल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदींनी महिला बचत गटातील तब्बल ३० हजार महिलांना प्रमाणपत्रांचं वाटप केलं.निवडणुका जिंकल्यानंतर आज मी पहिल्यांदा वाराणसीत आलो आहे. भारतात झालेल्या निवडणुकांमध्ये देशाच्या ६४ कोटींहून जास्त लोकांनी मतदान केलं आहे. पूर्ण जगात याहून मोठ्या निवडणुका कुठे होत नाहीत जिथे इतक्या मोठ्या संख्येनं लोक मतदानात सहभाग घेता. मी जी ७ च्या परिषदेसाठी इटलीला गेलो होतो. जी ७ च्या सर्व देशांच्या सर्व मतदारांना एकत्र केलं तरी भारतातल्या मतदारांची संख्या त्यांच्यापेक्षा दीडपट जास्त आहे. युरोपियन युनियनच्या सर्व मतदारांना एकत्र केलं तरी भारतीय मतदारांची संख्या त्यांच्यापेक्षा अडीचपट जास्त आहे. या निवडणुकीत ३१ कोटींहून जास्त महिलांनी सहभाग घेतला आहे. एका देशात महिला मतदारांनी सहभाग घेतल्याबाबत जगात सर्वाधिक आहे. अमेरिकेच्या जवळपास पूर्ण लोकसंख्येइतकं हे प्रमाण आहे.

# स्वदेशी सर्जिकल रोबोट ‘मंत्र’ वापर वापरुन टेलीसर्जरी !

## सर्जिकल रोबोट: भारतात पहिल्यांदाच कठीण शस्त्रक्रिया

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**मेडिकल क्षेत्रात आतापर्यंत विज्ञानाने मोठी प्रगती केली आहे. असाच एक विज्ञानाचा चमत्कार समोर आला असून यातून यशस्वीरित्या शस्त्रक्रिया करण्यात आली आहे. दिल्लीतील रोहिणी येथील रुग्णालयात भरती असलेल्या रुग्णावर गुरुग्राममधून डॉक्टरांनी यशस्वी शस्त्रक्रिया केली आहे.**

रोहिणीतील राजीव गांधी कॅन्सर इन्स्टिट्यूट अँड रिसर्च सेंटरच्या डॉक्टरांच्या पथकाने पहिल्यांदाच स्वदेशी सर्जिकल रोबोट ‘मंत्र’ वापरला आहे. पहिल्यांदा यशस्वीरित्या टेलीसर्जरी करण्यात आली आहे.ही शस्त्रक्रिया करण्यासाठी फायबर ऑप्टिक केबलने महत्त्वपूर्ण भूमिका साकारली आहे. डॉक्टर आणि रोबोटमध्ये एक कनेक्शन आवश्यक होतं. दोघंही एकमेकांपासून जवळपास ४० किमी दूर होते. संपूर्ण शस्त्रक्रिया एक तास ४५ मिनिटं सुरू होती. दिल्लीत राहणाऱ्या ५२ वर्षीय रुग्णाला युरिनरी ब्लेडर कर्करोग होता. त्यांच्यावर डॉ. एसके रावल यांनी शस्त्रक्रिया केली. त्यांनी शस्त्रक्रियेनंतर रुग्णाच्या तब्येतीबाबत अपडेट दिलं आहे. रुग्णावर करण्यात आलेल्या



शस्त्रक्रियेनंतर तो आता पूर्णपणे बरा असून त्याच्या तब्येतीत सुधारणा होत आहे. डॉ. एस.के. रावल म्हणाले की, भारतात तयार करण्यात आलेल्या या सर्जिकल रोबोमध्ये लहान शहरं आणि दुर्गम ठिकाणी आरोग्य सेवेत मोठी क्रांती घडवून आणण्याची क्षमता आहे. या रोबोट्सच्या मदतीने एक्सपर्ट सर्जन दुर्गम ठिकाणीही ऑपरेशन करू शकतात. या तंत्रज्ञानामुळे डॉक्टरांना स्वत: शारीरिकरित्या उपस्थित राहण्याची गरज नसेल. भारतात बनवलेल्या या रोबोट्समुळे सर्जन दूरवरुन ऑपरेशन करू शकतात. या रोबोट सर्जरीमध्ये अचूक शस्त्रक्रिया केली जाते. रुग्णाला केवळ ४ ते ५ सेमी शस्त्रक्रिया करणाऱ्या भागावर कट करावं लागतं. त्याऐवजी ओपन सर्जरीमध्ये शरीरावर १५ ते २० सेमी लांब कट द्यावे लागतात. यामुळे रोबो तंत्रज्ञानामुळे डॉक्टरांना रुग्ण कुठे आहे या पर्वा न करता कोणत्याही ठिकाणी असलेल्या रुग्णावर आवश्यक ती शस्त्रक्रिया किंवा देखभाल करता येऊ शकते.गांधी कॅन्सर इन्स्टिट्यूट अँड रिसर्च सेंटरच्या डॉक्टरांच्या पथकाने पहिल्यांदाच स्वदेशी सर्जिकल रोबोट ‘मंत्र’ वापरला आहे.

### सर्जिकल रोबोट मंत्र काय आहे?

यादरम्यान, रुग्णाला आरजीसीआयआरसीमध्ये ठेवण्यात आलं होतं आणि संपूर्ण शस्त्रक्रियेदरम्यान रुग्णालयातील इतर डॉक्टरांनी त्या रुग्णांची देखभाल केली. ही सर्वात किचकट शस्त्रक्रिया भारतात पहिल्यांदाच करण्यात आल्याचा दावा डॉक्टरांनी केला आहे. मेडिकल क्षेत्रात आतापर्यंत विज्ञानाने मोठी प्रगती केली आहे. असाच एक विज्ञानाचा चमत्कार समोर आला असून यातून यशस्वीरित्या शस्त्रक्रिया करण्यात आली आहे. दिल्लीतील रोहिणी येथील रुग्णालयात भरती असलेल्या रुग्णावर गुरुग्राममधून डॉक्टरांनी यशस्वी शस्त्रक्रिया केली आहे.

# 2024 मधली सर्वाधिक मानधन घेणारी अभिनेत्री

बॉलीवूड अभिनेत्री दीपिका पदुकोण तिच्या वैयक्तिक आयुष्यामुळे सध्या चर्चेत आहे. दीपिका चाहत्यांना लवकरच गुड न्यूज देणार आहे. दीपिका तिचा प्रेग्नेन्सीचा प्रवास खूप एन्जॉय करत असली तरी तिने तिच्या कामाला नेहमीच प्राधान्य दिलं आहे. अशातच माहितीनुसार आता दीपिका पदुकोण २०२४मधली सर्वाधिक मानधन घेणारी अभिनेत्री ठरली आहे. IMDB च्या मदतीने फोर्ब्सने संकलित केलेल्या यादीनुसार, अभिनेत्री दीपिका पदुकोण एका चित्रपटासाठी १५ ते ३० कोटी रुपये आकारते. यानुसार, दीपिका सर्वाधिक मानधन घेणारी अभिनेत्री ठरते. तसंच दीपिकानंतर अभिनेत्री आणि खासदार कंगना रणौत या एका सिनेमासाठी १५ ते २७ कोटींचं मानधन आकारतात अशी माहिती या यादीत आहे.अभिनेत्री प्रियांका चोप्रा ही या यादीत तिसऱ्या क्रमांकावर आहे. जी १५ ते २५ कोटी रुपये आकारते. तसंच कतरिना कैफ हीदेखील एका चित्रपटामागे १५ ते २५ कोटी रुपये इतक मानधन आकारते.आश्चर्याची बाब म्हणजे लोकप्रिय अभिनेत्री आलिया भट्ट या यादीत पाचव्या स्थानावर आहे. माहितीनुसार, आलिया एका चित्रपटासाठी १० ते २० कोटी रुपये आकारते. या यादीत समाविष्ट असलेल्या अभिनेत्रींमध्ये करीना कपूर खान ८ ते १८ कोटी रुपये, तर श्रद्धा कपूर (७ ते १५ कोटी रुपये) आणि विद्या बालन ८ ते १४ कोटी रुपये शुल्क आकारते.दरम्यान, गेल्या वर्षी दीपिकाचे 'पठाण' आणि 'जवान' हे दोन बिग बजेट चित्रपट प्रदर्शित झाले होते. यावर्षी दीपिका रोहित शेट्टी दिग्दर्शित 'सिंघम अगेन'च्या चित्रपटामध्ये झळकणार आहे. तर साउथ स्टार प्रभास आणि बिग बी अमिताभ बच्चन यांच्याबरोबर 'कल्की २८९८ एडी ' या चित्रपटातदेखील दीपिका महत्त्वाच्या भूमिकेत दिसणार आहे.

# सुनील शेट्टीने सांगितला दिवंगत वडिलांचा संघर्ष

अभिनेता सुनील शेट्टीने त्याचे वडील विरप्पा शेट्टी यांच्या संघर्षाबद्दल भाष्य केलं आहे. त्याचे वडील अवघ्या नवव्या वर्षी कर्नाटकमधील मंगळुरू इथून घरातून पळून मुंबईला आले होते. याठिकाणी त्यांनी मुंबईत वेटरचं काम केलं आणि हळूहळू याच क्षेत्रात रुळले. सुनीलचे वडील सुरुवातीला हॉटेलमध्ये टेबल पुसायचं काम करायचे आणि नंतर ते रेस्टॉरंट मॅनेजर झाले आणि शेवटी ते त्याचे मालक झाले. त्याच्या वडिलांनी केटरिंग क्षेत्रात ज्या तीन इमारतींमध्ये काम केलं होतं, त्या तिन्ही इमारतींचा मालक आता सुनील शेट्टी आहे. कॉमेडियन भारती सिंग आणि तिचा पती हर्ष लिंबाचिया यांच्याशी त्यांच्या पॉडकास्टवर गप्पा मारताना सुनील म्हणाला, "माझे वडील लहानपणी पळून मुंबईत आले. त्यांना वडील नव्हते, त्यांना फक्त तीन बहिणी होत्या. त्यांना वयाच्या नवव्या वर्षी एका दक्षिण भारतीय रेस्टॉरंटमध्ये काम मिळालं. आपल्या समाजात हीच गोष्ट खास आहे की आपण एकमेकांना आधार देतो. माझ्या वडिलांचं पहिलं काम टेबल साफ करणं हे होतं. ते इतके लहान होते की त्यांना तो टेबल पूर्ण साफ करण्यासाठी एकाच टेबलच्या चार फेऱ्या कराव्या लागायच्या. ते भाताच्या पोत्यावर झोपायचे."सुनीलचे वडील नंतर बरीच वर्षे तिथे काम करत राहिले, एकवेळ अशी आली की ते मालकाच्या तिन्ही इमारती सांभाळू लागले. "माझ्या बाबांच्या बॉसने तीन इमारती विकत घेतल्या आणि त्या माझ्या बाबांना सांभाळायला सांगितलं.

# ट्रेनमध्ये भेट, लग्नाचा निर्णय

लोकप्रिय गायिका अलका याज्ञिक यांनी बॉलीवूडला अनेक सुपरहिट गाणी दिली आहेत. त्यांनी आजवर १६ हून अधिक भाषांमध्ये सुमारे दोन हजारपेक्षा जास्त गाणी रेकॉर्ड केली आहेत. त्यांनी गायलेली बहुतांशी गाणी हिट राहिली आहेत. ५८ वर्षांच्या अलका याज्ञिक अनेक स्टेज शो करतात, पण आता त्यांना एका दुर्मिळ आजाराचं निदान झालं आहे. सेन्सरी नर्व्ह हिअरिंग लॉस असं या आजाराचं नाव आहे. यामुळे त्यांच्या ऐकण्याच्या क्षमतेवर परिणाम झाला आहे. मागच्या ४० वर्षांपासून गायनक्षेत्रात सक्रिय असलेल्या अलका याज्ञिक यांनी गायनाव्यतिरिक्त 'सा रे ग मा प लिटल चॅम्प्स', 'इंडियन आयडॉल', 'सुपरस्टार सिंगर' यासह टेलिव्हिजनवरील अनेक रिॲलिटी शोजचे परीक्षण केले आहे. लोकांना त्यांची गाणी आणि करिअरबद्दल बऱ्यापैकी माहित आहे, पण त्यांच्या वैयक्तिक आयुष्याबद्दल खूप जणांना माहित नाही. आपल्या गायनाने प्रेक्षकांना मंत्रमुग्ध करणाऱ्या या गायिकेची लव्ह स्टोरी खूपच हटके आहे. अलका यांचा जन्म २० मार्च १९६६ मध्ये कोलकातामध्ये झाला. गुजराती कुटुंबात जन्मलेल्या अलका यांच्या आईही शास्त्रीय संगीत गायिका होत्या. अलका यांनी लहान वयातच शास्त्रीय गाणं शिकायला सुरुवात केली. ६ व्या वर्षापासून त्यांनी कोलकाता आकाशवाणी आणि ऑल इंडिया रेडिओवर गायला सुरूवात केली होती. १० व्या वर्षी त्या आईसोबत मुंबईत आल्या. त्या लहान असतानाच त्यांच्या आईचे निधन झाले. राज कपूर यांनी अलका यांच्या आवाजातील जादू ओळखली आणि त्यांना संगीत दिग्दर्शक लक्ष्मीकांत यांच्याकडे पाठवले.



# मिथुन चक्रवर्तीकडे आहेत 116 श्वान

अनेक कलाकार प्राणीप्रेमी आहेत. ते आपल्या पाळीव प्राण्यांची पोटच्या मुलाप्रमाणे काळजी घेतात. अनेक सेलिब्रिटींकडे श्वान आहेत. ते त्यांच्याबरोबरचे फोटो पोस्ट करताना दिसतात. अनेक जण आपल्या लाडक्या श्वानांना फिरायला घेऊन जाताना दिसतात. पण एक बॉलीवूड अभिनेता असा आहे, ज्याच्याकडे १०० हून अधिक श्वान आहेत. त्याचं प्राण्यांवर इतकं प्रेम आहे की त्याने ४५ कोटी रुपयांची मालमत्ता त्या श्वानांना आरामात राहता यावं, यासाठी वापरली आहे. या ठिकाणी प्रत्येक श्वानासाठी वेगळी खोली असून त्यांची काळजी घेण्यासाठी माणसं कामावर ठेवण्यात आली आहे. श्वानांसाठी उदार मनाने हे सगळं करणारे दिग्गज बॉलीवूड अभिनेते मिथुन चक्रवर्ती आहेत. मिथुन चक्रवर्ती श्वानप्रेमी आहेत. ते ११६ श्वानांची देखभाल करत असल्याचं म्हटलं जातं. हे सगळे श्वान त्यांच्या मुंबई आणि इतर ठिकाणावरील मालमत्तेत राहतात. मीडिया रिपोर्ट्सनुसार, मिथुन यांनी मुंबईजवळील मढ आयलंडमध्ये त्यांच्या दीड एकर जागेत ७६ श्वान ठेवले आहेत. हाऊसिंग डॉट कॉमनुसार सुमारे ४५ कोटी रुपयांच्या जमिनीवर बांधलेल्या या मालमत्तेत त्यांचं घर आहे, त्यांचे श्वानही इथेच राहतात. तसेच याठिकाणी खेळायचं मैदानदेखील आहे. याठिकाणी त्यांच्या श्वानांसाठी सर्व आधुनिक सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.गेल्या वर्षी एका मुलाखतीत मिथुन यांची सून अभिनेत्री मदालसा शर्माने याबाबत खुलासा केला होता. "प्रत्येक श्वानासाठीव वेगळी जागा आहे, त्यांच्यासाठी वेगळ्या-वेगळ्या खोल्या देखील आहेत. एक कर्मचारी या श्वानांची काळजी घेतो. श्वानांची लहान मुलांप्रमाणे काळजी घ्यावी लागते, त्यांना आंघोळ घालणं त्यांना वेळेवर जेवायला देणं, त्यांना फिरायला नेणं ही मोठी जबाबदारी आहे. जेव्हा तुमच्याकडे मोठ्या संख्येने श्वान असतात तेव्हा काळजी घेण्यासाठी आणि त्यांच्यावर प्रेम करण्यासाठी तुमच्याकडे जास्त लोक असावे लागतात.

# पूजा सावंत लवकरच लग्नबंधनात अडकणार

मराठीमोळी 'कलरफुल' अभिनेत्री पूजा सावंत (POOJA SAWANT) लवकरच लग्नबंधनात अडकणार आहे. पूजा कधी आणि कोणासोबत लग्न करणार याची चाहत्यांना उत्सुकता होती. अखेर काही दिवसांपूर्वी तिने जोडीदारासोबतचा फोटो शेअर करत चाहत्यांना आनंदाची बातमी दिली. एबीपी माझाला दिलेल्या मुलाखतीत पूजाने उखाणे घेण्यास सज्ज असल्याचं सांगितलं आहे. पूजा सावंत ही मराठी मनोरंजनसृष्टीतील आघाडीची अभिनेत्री असून सिद्धेश चव्हणसोबत (SIDDHESH CHAVAN) लवकरच ती विवाहबंधनात अडकणार आहे. आयुष्यातल्या 'मुसाफिर'बद्दल एबीपी माझाशी बोलताना पूजा सावंत (POOJA SAWANT ON FIANCE) म्हणाली,"माझ्या रिअल लाईफ हिरोचं नाव सिद्धेश चव्हाण आहे. आता आयुष्याचा नवा अध्याय सुरू होणार आहे. सिद्धेश आणि माझं अरेंज मॅरेज आहे. एकमेकांना पहिल्यांदा भेटल्यापासून लग्न ठरवण्यापर्यंत आम्ही खूप वेळ घेतला. त्यामुळे ते अरेंज कम लव्ह मॅरेज असेल". लग्नाच्या मुहूर्ताबद्दल बोलताना (POOJA SAWANT ON MARRIAGE) पूजा सावंत म्हणाली,"चव्हाण आणि सावंत हे दोन्ही कुटुंबिय मिळून लग्नाबाबत निर्णय घेतील. सध्या दोन्ही कुटुबियांमध्ये लग्नाबाबत बोलणी सुरू आहे. सिद्धेशला त्याच्या कामातून आणि मला माझ्या प्रोजेक्टमधून वेळ मिळेल त्यावेळी लगेचच आम्ही लग्न करू. उखाणे घेण्यास आता मी सज्ज आहे". पूजा सावंत म्हणते,"आमचं लव्हमॅरेजच आहे. पहिल्यांदा भेटल्यापासून ते हाच आपला जोडीदार म्हणून योग्य आहे हे ठरवण्याच्या प्रोसेसदरम्यान आम्ही अनेकदा एकमेकांना भेटत होतो. त्यावेळी एकमेकांचे स्वभाव कळले. वैयक्तिक आयुष्यासंबंधित गोष्टींचं गुपित ठेवायला मला आवडतं. त्यामुळे गेलं दीड वर्ष मी हे नातं सर्वांपासून लपवून ठेवलं". पूजा पुढे म्हणते,"सिद्धेश मला क्लिक झाला असा एक क्षण सांगता येणार नाही..असे अनेक क्षण आले. पहिल्या भेटीतच मला सिद्धेश आवडला होता. स्थळ आल्यानंतर पहिला फोन मी त्याला केला होता. पुढे हळूहळू सिद्धेशचा स्वभाव कळला. तो प्रचंड सपोर्टिव्ह आहे. तसेच कायमच माझ्या पाठिशी आहे. सिद्धेशसोबत घालवलेल्या प्रत्येक क्षणाला मला वाटत होतं की हाच माझ्यासाठी योग्य जोडीदार आहे".



# संतापलेल्या हारिसने पत्नीलाही ढकललं!

## नवे प्रशिक्षक गॅरी कर्स्टन यांनीही संघातील खेळाडूंवर ताशेरे ओढले

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**टी-२० विश्वचषकातील खराब कामगिरीनंतर पाकिस्तानी खेळाडूंवर जोरदार टीका होत आहे. नवे प्रशिक्षक गॅरी कर्स्टन यांनीही संघातील खेळाडूंवर ताशेरे ओढले. कर्स्टन यांनी सांगितले की खेळाडू एकमेकांना साथ देत नाहीत आणि असं वातावरण त्यांनी आजवर कोणत्याच संघात पाहिलं नाही. वेगवान गोलंदाज हारिस रौफही टीकाकारांच्या निशाण्यावर आहे. यंदाच्या विश्वचषकात धावा रोखण्यात तो अपयशी ठरला असून त्याला फार चांगली कामगिरी करता आली नाही. याच दरम्यान एक चाहता हारिससोबत बोलत असताना संघाच्या कामगिरीवर तो बोलू लागला आणि पत्नीसोबत जात असलेला हारिस भडकला आणि त्याच्या अंगावर धावून गेला. ज्याचा व्हीडिओ सध्या प्रचंड व्हायरल होत आहे.**



व्हायरल व्हीडिओमध्ये हारिस खूप संतापलेला दिसत आहे. तो अमेरिकेत एका चाहत्याला मारण्यासाठी त्याच्या अंगावर धावून गेला. यामध्ये त्याची पत्नी मुझना मसूद मलिकही त्याच्यासोबत दिसत आहे. हारिस इतका संतापला की त्याने पत्नीला ढकलून दिलं आणि चाहत्याला मारण्याचा प्रयत्न केला. कसंबसं इतरांनी त्याला अडवले. हरिसला टी-२० विश्वचषकातील ४ सामन्यांत फक्त ६ विकेट घेता आल्या. यादरम्यान त्याने गोलंदाजी करताना एकूण १०१ धावा दिल्या.व्हिडिओमध्ये असा दावा केला जात आहे की बाबर आझमच्या टीमचा प्रमुख खेळाडू हारिस रौफ हा हॉटेलजवळ पत्नीसोबत फिरताना दिसला आणि बाजूने जाणारे चाहते त्याला काहीतरी म्हणाले. यावर तो इतका संतापला की बाजूला लावलेली झाडे ओलांडून तो पायातील चप्पल काढून टाकत चाहत्याच्या अंगावर धावून गेला. चाहते त्याला नेमकं त्याला काय म्हणाले याचा अंदाज लागला नाही. पण हारिस त्याला म्हणाला, काय रे बापाला शिवीगाळ करतोस का?हे सारं पाहून आणखी काही लोकही होते, जे त्याला चाहत्याच्या जवळ जाण्यापासून वाचवतात यावर तो म्हणतो – हा नक्कीच भारतीय असेल...तर यावर चाहताही मागे हटताना दिसत नाहीत. तो पुढे सरकतो आणि छाती उंचावत म्हणतो – मी पाकिस्तानी आहे. यावर हारिस म्हणतो, तुझ्या वडिलांनी तुला हेच शिकवलं का? हारिसचा हा भडकलेला अवतार पाहून व्हीडिओवर चाहत्यांच्या कमेंट्सचा पाऊस पडला आहे. याआधी आझम खानही चाहत्यासोबत भांडताना दिसला होता. चाहत्याने आपल्यासोबत गैरवर्तन करत असल्याचा आरोप त्याने केला. पाकिस्तानचा वेगवान गोलंदाज हारिस रौफ वादात सापडला आहे. भररस्त्यात चाहत्याशी भांडण करत असतानाचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. हा व्हिडिओ अमेरिकेतील असून रौफ आणि त्याची पत्नी फिरत होत. तेव्हा कोणीतरी त्याच्यावर कमेंट केली. यामुळे रौफ भलताच संपला आणि त्याला मारण्यासाठी त्याच्या अंगावर धावून गेला. रौफला रोखण्यासाठी त्याची पत्नीही मागे धावली. लोकही जमले आणि बराच वेळ हा वाद सुरू होता. पण आता या वादावर हारिस रौफने आपली बाजू मांडली आहे.रौफचा हा व्हिडिओ मंगळवारी दुपारी व्हायरल झाला. ज्यामध्ये तो अमेरिकेतील एका पाकिस्तानी चाहत्याला भारतीय समजून त्याच्या कमेंटवर त्याला मारण्यास सरसावला. पत्नीसोबत उभ्या असलेल्या रौफने तिचा हात सोडला आणि त्याच्या अंगावर धावून गेला. या व्हायरल व्हिडिओमध्ये त्यांचं बोलणंही थोडं थोडं ऐकू येत आहेत. हारिस रौफ त्या चाहत्याला म्हणाला हा भारतीय वाटतोय. यावर तो चाहताही ठाम उभा राहिला आणि त्याला म्हणाला-

### काय म्हणाला हारिस रौफ?

पाकिस्तानी खेळाडूचा हा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर हारिस रौफने एक्सवर पोस्ट शेअर करत स्पष्टीकरण दिले आहे. स्पष्टीकरण देताना रौफने लिहिले की, 'मी हा वाद सोशल मीडियावर न आणण्याचा निर्णय घेतला होता, परंतु हा व्हिडिओ समोर आला आहे. त्यामुळे यावर माझे मत मांडणं मला महत्त्वाचे वाटते. एक सामाजिक व्यक्तिमत्त्व म्हणून आम्ही लोकांकडून सर्व प्रकारच्या प्रतिक्रिया स्वीकारण्यास तयार आहोत. आम्हाला पाठिंबा देण्याचा किंवा टीका करण्याचा त्यांना अधिकार आहे. पण प्रश्न जेव्हा आई-वडिलांचा आणि कुटुंबाचा येतो तेव्हा मी प्रत्युत्तर देण्यास मागे-पुढे पाहणार नाही. एखादी व्यक्ती आणि त्यांच्या कुटुंबाबद्दल आदर दाखवणे महत्वाचे आहे, मग त्यांचं प्रोफेशन कोणतंही असो.'

# धोनीचा चाहत्याबरोबरचा व्हिडीओ व्हायरल

## माहीने कार थांबवत चाहत्याची इच्छा केली पूर्ण

।नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारतीय संघाचा माजी कर्णधार महेंद्रसिंग धोनीचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. वास्तविक, एमएस धोनी रांचीमध्ये असलेल्या त्याच्या फार्महाऊसमध्ये त्याची मर्सिडीज AMG G63 चालवत प्रवेश करणार होता, तितक्यात एका चाहत्याने त्याला थांबवत त्याच्याबरोबर एक फोटो क्लिक करण्याची विनंती केली. यानंतर धोनीने नम्रपणे त्याच्यासोबत एक फोटो काढला. त्यानंतर आता लोकांना हाच धोनीचा साधेपणा खूप आवडत आहे.**




व्हायरल व्हिडिओमध्ये एक चाहता धोनीच्या कारजवळ आला आणि म्हणाला, "मला एक फोटो द्याना, एक फोटो प्लीज सर. फक्त एक सेकंद लागेल, प्लीज काच खाली करा सर." धोनीने सुरुवातीला फोटो क्लिक करण्यास नकार दिला असला तरी नंतर हसत हसत कारची काच खाली करून फॅनला स्वत:बरोबर एक फोटो क्लिक करू दिला. या नम्र स्वभावामुळे चाहते सोशल मीडियाच्या माध्यमातून धोनीवर भरभरून प्रेमाचा वर्षाव करत आहेत.याआधी धोनीचा त्याच्या कुटुंबासोबतचा एक व्हिडिओ समोर झाला होता. फादर्स डेच्या निमित्ताने धोनीची मुलगी झिवाने इंस्टाग्रामवर एक व्हिडिओ क्लिप शेअर केली होती, ज्यामध्ये धोनी पत्नी साक्षी, मुलगी झिवा आणि त्याच्या पाळीव कुत्र्यांसोबत वेळ घालवताना दिसत आहे. या व्हिडिओमध्ये त्याच्याकडे वेगवेगळ्या जातीचे कुत्रे असल्याचे स्पष्टपणे दिसत आहे. धोनीला कुत्रे पाळण्याचीही खूप आवड आहे आणि त्याचे अनेक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरलही होतात.रांची येथील एमएस धोनीचे फार्महाऊस अनेक सुविधांनी सुसज्ज आहे. हे फार्महाऊस सात एकरमध्ये पसरले असून त्याची किंमत अंदाजे ६ कोटी रुपये असल्याचे सांगण्यात येत आहे. फार्महाऊसचा बराचसा भाग झाडांनी व्यापलेला आहे आणि एक बाग देखील आहे. क्रिकेटच्या सरावासाठी खेळपट्टी, नेटसह व्यायामशाळा, स्विमिंग पूल आणि इनडोअर स्टेडियमही येथे बांधण्यात आले आहे. लिव्हिंग एरियाजवळही अनेक झाडे आणि वनस्पती आहेत.

### अन् चाहता धोनीच्या कारजवळ आला

व्हायरल व्हिडीओमध्ये एक चाहता धोनीच्या कारजवळ आला आणि म्हणाला, "मला एक फोटो द्याना, एक फोटो प्लीज सर. फक्त एक सेकंद लागेल, प्लीज काच खाली करा सर." धोनीने सुरुवातीला फोटो क्लिक करण्यास नकार दिला असला तरी नंतर हसत हसत कारची काच खाली करून फॅनला स्वत:बरोबर एक फोटो क्लिक करू दिला. या नम्र स्वभावामुळे चाहते सोशल मीडियाच्या माध्यमातून धोनीवर भरभरून प्रेमाचा वर्षाव करत आहेत.याआधी धोनीचा त्याच्या कुटुंबासोबतचा एक व्हिडिओ समोर झाला होता. फादर्स डेच्या निमित्ताने धोनीची मुलगी झिवाने इंस्टाग्रामवर एक व्हिडिओ क्लिप शेअर केली होती, ज्यामध्ये धोनी पत्नी साक्षी, मुलगी झिवा आणि त्याच्या पाळीव कुत्र्यांसोबत वेळ घालवताना दिसत आहे.